# प्रेसनोट

दि. ०२/०६/२०२४

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | नाशिक/अहमदनगर |
| गुन्हा नोंद क्रमांक | श्रीरामपूर शहर पो.स्टे., जि.अहमदनगर गुरनं.५८९/२०२४ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७, ७(अ) |
| आरोपीचे नांव व कार्यालय | १) रघुनाथ आश्रुबा खेडकर, वय–५५ वर्ष, पोलीस हवालदार, बक्कल नं.५६३, वर्ग–३, नेमणुक श्रीरामपूर शहर पोलीस स्टेशन, जि.अहमदनगर<br>२) राजू शामकुमार श्रीवास्तव (खाजगी इसम), वय–४६ वर्ष, धंदा–चहाची टपरी, रा.के.व्हि. रोड, भैय्या गल्ली, श्रीरामपूर, ता.श्रीरामपूर, जि.अहमदनगर |
| मागणी केलेल्या लाचेची रक्कम | २०,०००/– रुपये तडजोडीअंती १२,०००/– रुपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | १२,०००/– रूपये |
| थोडक्यात माहिती | प्रस्तुत बातमीतील हकीगत अशी की, यातील तक्रारदार यांचे भावाच्या नावे टाटा एच जी व्ही टिप्पर मालकीचा होता. सदर टिप्पर त्यांच्या भावानी दि.२२/१२/२०२३ रोजी वाहन खरेदी पावती करुन त्यांचे नातेवाईकास विकून ताब्यात दिला होता. सदर टिप्पर दि.५/२/२०२४ रोजी अवैध मुरुम वाहतूक करते वेळी तहसिल कार्यालय, श्रीरामपूर यांनी पकडून तहसिल कार्यालय, श्रीरामपूर येथे जमा केला होता. सदरचा टिप्पर तहसिल कार्यालय, श्रीरामपूर आवारातून चोरी झाला होता. त्यावरुन अज्ञात इसमाविरुध्द श्रीरामपूर शहर पोलीस स्टेशन येथे दि.७/२/२०२४ रोजी गुरनं.१४४/२०२४ भा.दं.वि.क. ३७९ अन्वये गुन्हा दाखल असून सदर गुन्हयाचा तपास आरोपी लोकसेवक रघुनाथ आश्रुबा खेडकर, पोलीस हवालदार, बक्कल नं.५६३, नेमणुक श्रीरामपूर शहर पोलीस स्टेशन हे करत होते. तपासामध्ये तक्रारदार यांचेकडून टिप्पर खरेदी केलेले नातेवाईक व त्यांच्या चालकानेच टिप्पर चोरी केल्याचे निष्पन्न झालेने तक्रारदार यांचे नातेवाईक व टिप्पर चालकाला आरोपी लोकसेवक खेडकर यांनी सीआरपीसी ४१(१)(अ) प्रमाणे नोटीस दिली होती. सदर गुन्हयाचे तपासाचे अनुषंगाने आरोपी लोकसेवक खेडकर यांनी दि.३१/५/२०२४ रोजी यातील तक्रारदार यांची भेट घेऊन तक्रारदार यांच्याकडे त्यांचे भावाकरीता सीआरपीसी ९१ प्रमाणे नोटीस दिली व सदर गुन्हया मध्ये तक्रारदार यांचे भावाचे नाव न येण्याकरीता तक्रारदार यांचेकडे ४०,०००/– रुपयांची मागणी करुन तक्रारदार व त्यांचे टिप्पर खरेदी केलेले नातेवाईक यांना दि.१/६/२०२४ रोजी श्रीरामपूर शहर पोलीस स्टेशन येथे बोलाविले असल्याबाबतची तक्रार ला.प्र.वि.अहमदनगर कडे दिनांक १/६/२०२४ रोजी प्राप्त झाली होती.<br>त्यानुसार दि.१/६/२०२४ रोजी लाच मागणी पडताळणी करण्यात आली, पडताळणी दरम्यान आरोपी लोकसेवक क्र.१ रघुनाथ आश्रुबा खेडकर यांनी तक्रारदार यांच्याकडे पंचासमक्ष २०,०००/– रुपये लाचेची मागणी करुन तडजोडी अंती १२,०००/– रुपयांची मागणी केली व सदर लाच रक्कम स्वीकारण्याची तयारी दर्शविली. यशस्वी सापळा कारवाई दरम्यान सदरची लाच रक्कम आरोपी लोकसेवक खेडकर यांनी खाजगी इसम राजु श्रीवास्तव यांच्याकडे देण्यास सांगितली असता खाजगी इसम श्रीवास्तव यांनी आरोपी लोकसेवक खेडकर यांचे सांगणेवरुन आरोपी लोकसेवक खेडकर तसेच पंचासमक्ष लाच स्विकारली असता त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले आहे तसेच आरोपी लोकसेवक खेडकर यांना ताब्यात घेवून दोघांविरुध्द श्रीरामपूर शहर पोलीस स्टेशन, जि.अहमदनगर गुरनं.५८९/२०२४ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७, ७(अ) प्रमाणे दि.२/६/२०२४ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागण्या–या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्याशी संपर्क करावा.

संपर्क पत्ता :– लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय, जिल्हा मध्यवर्ती प्रशासकिय इमारत, टि.व्ही. सेंटरसमोर, सावेडी, अहमदनगर

संकेतस्थळ :– acbmaharashtra.gov.in

ई–मेल :– acbwebmail@mahapolice.gov.in

ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन :– acbmaharashtra.net

टोल फ्री क्रमांक :– १०६४

दुरध्वनी क्रमांक :– ०२४१–२४२३६७७

व्हॉटस अप क्रमांक :– ९९३०९९७७००

(प्रविण लोखंडे)
पोलीस उप अधीक्षक,
ॲन्टी करप्शन ब्युरो, अहमदनगर